# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक २८.१०.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २७/१०/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ५३ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ४३,९००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत दि.२७/१०/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत पोस्टे वसमत ग्रा.येथे ०१ ठिकाणी छापा टाकुन आरोपी यांचे विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी असा एकुण १२,३५०/—रू माल जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**चोरी :—**दिनांक २७/१०/२०२२ रोजी फिर्यादी प्रकाश किशनराव भारती रा लहुजी नगर औंढा ना ता औंढा ना यांचे फिर्यादी वरून पोस्टे औंढा ना.येथे कलम ३८०,४५७ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.२३.१०.२२ रोजी चे सायंकाळी ०६:०० वा चे पासुन ते दि २४.१०.२०२२ रार्जीचे सकाळी ०९.०० वा पर्यंत मौ वाळकी येथील शेत शिवार गट क्र ०१ मधील शेतातील कादुन शेतातील आखाडयावरील पत्राचे शेडमध्ये अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या शेतातील आखाडयावरील पत्राचे शेडमध्ये ठेवलेले सोयाबीन ने भरलेले १० कट्टे अंदाजे ५ कुंटल अंदाजे किअ २०,००० रू शेडचे कुलुप तोडुन कोणीतरी अज्ञात इसमाने चोरून नेले आहे म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात औंढा ना.पोलीस तपास करित आहेत.

दिनांक २७/१०/२०२२ रोजी फिर्यादी नरेंद्र दत्तगीर गिरी रा मोहरी ता मंगरूळपीर जि वाशिम ह मु गंगाघर क्र १९० हनुमान मंदिराजवळ हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे हिंगोली ग्रा.येथे कलम ४५७,३८०,४५४ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.२२.१०.२०२२ रोजी १४.०० वा ते दि २५.१०.२०२२ रोजी २१.२० वा दरम्यान फिर्यादी घरी गंगाघर क्र १९० हनुमान मंदिरा जवळ हिंगोली येथे आरोपीने फिर्यादी हि दिवाळी सनानिमीत्त त्यांचे गावी गेले असतांना त्यांचे घराचे समोरील कुलुप लावलेल्या दरवाज्याचा कोंडा तोडुन घराच्या आत प्रवेश करून बेडरूमध्ये ठेवलेल्या लोखंडी कपाटातील नगदी ५०,००० रू व सोण्या चांदीचे दागीने कि ४१,५०० रू चे व दोन मोबाईल एक टॅबलेट व कॅमेरा किअ ४०,५०० असा एकुन १,३२,००० रू रू माल अज्ञात चोरटयाने चोरून नेला म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हिंगोली ग्रा.पोलीस तपास करित आहेत.